


# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर




वर्ष २९ वे | अंक ३०६ | पाने ६ | गुरुवार | दि. १८ डिसेंबर २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५




# अखेर कोकाटेंचा मंत्रीपदाचा राजीनामा

## कोर्टाच्या अटक वॉरंट नंतर ते लिलावतीत दाखल:सदनिका प्रकरण भोवले

**मुंबई/प्रतिनिधीः–**

राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात नाशिक जिल्हा न्यायालयाने अटक वॉरंट जारी केल्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सदनिका घोटाळा प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा सत्र न्यायालयाने कायम ठेवल्यानंतर हा महत्त्वपूर्ण टप्पा समोर आला असून आता माणिकराव कोकाटे यांनी क्रीडामंत्रिपदाचा राजीनामा दिला असल्याची माहिती समोर आली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माणिकराव कोकाटे यांचे क्रीडा खाते काढण्याची शिफारस राज्यपालांकडे केली होती. त्यानंतर आता कोकाटे यांचे खाते हे उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे देण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच आता हे खाते कोणाकडे दिले जाणार याचा निर्णय हा अजित पवार यांच्याकडे असणार आहे. त्यामुळे क्रीडा खाते कोणाकडे दिले जाणार याकडे देखील सर्वांचे लक्ष असणार आहे.

नाशिक सत्र न्यायालयाने मंगळवारी सदनिका घोटाळाप्रकरणात माणिकराव कोकाटे यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली होती. त्यामुळे कोकाटे यांच्या अडचणीत वाढ झाली होती. कोकाटे यांनी सत्र न्यायालयाच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र, त्याची सुनावणी शुक्रवारी होणार आहे, त्यापूर्वीच माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा दिल्याचे समोर आले आहे. ऐन निवडणुकीत कोकाटे यांनी राजीनामा दिल्याने अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का बसल्याचे बोलले जात आहे.

माणिकराव कोकाटे हे वादात सापडण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी विधीमंडळाच्या सभागृहात चक्क मोबाईलवर 'रम्मी' गेम खेळल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर झाला होता. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी यासंदर्भातील व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केल्यानंतर विरोधकांनी कोकाटेंच्या राजीनाम्याची जोरदार मागणी लावून धरली होती. मात्र, त्यावेळी त्यांचा राजीनामा न घेता केवळ खातेबदल करण्यात आला होता, ज्यामुळे त्यांना आपले तत्कालीन कृषी मंत्रिपद गमवावे लागले होते.

माणिकराव कोकाटे यांची खाती उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत. नाशिक सत्र न्यायालयाने काल (मंगळवारी, ता १६) सदनिका घोटाळाप्रकरणात माणिकराव कोकाटे यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली होती. यामुळं माणिकराव कोकाटे यांच्या अडचणीत वाढ झाली होती. विरोधी पक्ष माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासाठी आक्रमक झाले होते. कोकाटे यांनी सत्र न्यायालयाच्या निर्णयाला मुंबई हायकोर्टात आव्हान दिलं होतं. मात्र, त्याची सुनावणी शुक्रवारी होणार आहे, त्यापूर्वीच माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा दिल्याचं समोर आलं आहे.

## पाचगणीत मुंबईच्या 'हायप्रोफाईल' टोळीकडून कोकेनची तस्करी

### १० तस्कर जेरबंद

**पाचगणी/प्रतिनिधीः–**

पाचगणी हे प्रसिद्ध पर्यटन स्थळ आणि जागतिक दर्जाचे शैक्षणिक स्थळ असलेल्या पाचगणीला ड्रग्जच्या विळख्यातून वाचवण्यासाठी सातारा पोलीस दलाने मोठी कारवाई केली आहे. मुंबईहून दोन आलिशान गाड्यांमधून आलेल्या १० संशयितांना पाचगणी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने (डउइ) संयुक्त सापळा रचून ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ५ लाख रुपये किमतीचे कोकेन आणि दोन वाहनांसह एकूण ४२ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक तुषार दोशी आणि अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही धाडसी मोहीम फत्ते करण्यात आली. बुधवारी मध्यरात्री घाटजाई मंदिराजवळील व्हिस्टा ग्रॅण्ड सोसायटीत

पान २ वर



पाचगणी : अमली पदार्थ तस्करी प्रकरणी अटक केलेल्या १० आरोपीं समवेत मुद्देमाल आणि पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी (रविकांत बेलोशे)

थंड हवेचे ठिकाण आणि 'विद्येचे माहेरघर' म्हणून जगप्रसिद्ध असलेल्या पाचगणी शहरात आज मुंबईहून आलेल्या १० आरोपींना अमली पदार्थांची तस्करी करताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. या घटनेमुळे संपूर्ण सातारा जिल्ह्यात खळबळ माजली आहे. जागतिक दर्जाच्या शाळा आणि सुसंस्कृत वारसा असलेल्या पाचगणीत असे प्रकार घडणे दुर्दैवी आहे. अमली पदार्थांच्या या विळख्याने शैक्षणिक केंद्राचे नाव बदनाम होत असून, प्रशासनाने अशा प्रवृत्तींविरुद्ध कठोर पावले उचलण्याची गरज आहे.

अवघ्या दोन दिवसांपूर्वीच जावळी तालुक्यातील सायळी येथे तब्बल ११५ कोटी रुपयांचे एमडी ड्रग्स जप्त करण्यात आले होते. त्या मोठ्या कारवाईनंतर लगेचच पाचगणीसारख्या शांत पर्यटननगरीत ड्रग्सचा तस्करी सुरू असल्याची माहिती समोर आल्याने या कारवाईकडे गांभीर्याने पाहिले जात आहे.


नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पाचगणी व महाबळेश्वर परिसरात पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी अपेक्षित आहे. या काळात अमली पदार्थांची विक्री व सेवन वाढू नये यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली असून, पर्यटनस्थळांचा गैरवापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

**– सपोनी दिलीप पवार**

## पुसेगावात आज परमपूज्य श्री. सेवागिरी महाराजांचा रथोत्सव सोहळा

पुसेगाव/प्रतिनिधीः–

महाराष्ट्रासह आंध्र कर्नाटकातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पुसेगाव तालुका खटाव येथील परमपूज्य श्री सेवागिरी महाराजांच्या ७८ व्या पुण्यस्मरणानिमित्त आज गुरुवारी १८ डिसेंबर रथोस्तव सोहळा व राज्यस्तरीय सेवागिरी कृषी व पशुपक्षी प्रदर्शन उद्घाटन सोहळा संपन्न होत आहे.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, व अजित पवार यांच्या हस्ते व विविध खात्यांच्या मंत्र्याच्या प्रमुख उपस्थितीत रथपूजन होणार असल्याचे मठाधिपती परमपूज्य महंत सुंदरगिरी महाराज व देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष संतोष वाघ व विश्वस्तांनी माहिती दिली आहे.

परमपूज्य श्री सेवागिरी महाराजांच्या संजीवन समाधीचे हे ७८ वे वर्ष आहे. देवस्थान ट्रस्टच्या व ग्रामपंचायत पुसेगाव यांच्या वतीने या वार्षिक यात्रेसाठी पुसेगाव नगरीत सर्व तयारी पूर्ण झाली असल्याचे विश्वस्त डॉक्टर सुरेश जाधव रणधीर जाधव, संतोष उर्फ बाळासाहेब जाधव, गौरव जाधव, सचिन देशमुख यांनी सांगितले

मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हस्ते आणि मठाधिपती परमपूज्य सुंदरगिरी महाराज जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य राधाकृष्ण विखे पाटील माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई

पान ५ वर

### श्वास..

वृक्षारोपण समारोह
इव्हेंट करु या खास
शब्दबोले परवलीचे
नसे पर्यावरण -हास
रोपेलावा माळराना
सुशोभित रे आरास
बडी मंडळी बोलावे
कार्यक्रम हो फर्मास
पार्टी झोडू आनंदात
वन भोजन झकास
बडी नेते मंडळी इथे
भेटाया येई हमखास
फोटोग्राफर बोलावले
प्रसिद्धी मिळे फर्मास
धूम धमाल मिडियांत
वलयात विनासायास
वनराई बहरली इकडे
कागदोपत्रांत विकास
नोंदणी लाखो वृक्षांची
प्रत्यक्षांत विजन वास
इकडेचाले वृक्षारोपण
ठेवला संपूर्ण विश्वास
तिकडे वृक्षांचीकत्तल
अडकलामध्यातश्वास

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## कराड पालिका निवडणूक मतमोजणीची तयारी पूर्ण

**कराड/प्रतिनिधी:–**

कराड नगरपालिका निवडणुकीच्या मतमोजणीसाठी सर्व तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अतुल म्हेत्रे यांनी दिली.

यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी शिंदे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत व्हटकर, नायब तहसीलदार विश्वजितसिंह राजपूत, सहायक महसूल अधिकारी युवराज पाटील, प्रवीण पवार तसेच संगणक ऑपरेटर शिवराज माळी उपस्थित होते.



यानिमित्त आयोजित मतमोजणीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देताना श्री. म्हेत्रे म्हणाले, आतापर्यंत मतदान प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध व चोखपणे पार पडली असून त्याबद्दल सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक आहे. मात्र मतदान प्रक्रियेतील सर्वांत महत्त्वाचा आणि अत्यंत जबाबदारीचा टप्पा म्हणजे मतमोजणी असून ती सर्वांनी अत्यंत दक्षतेने व नियमांचे काटेकोर पालन करून पार पाडावी.

पान ३ वर

### मतमोजणी कक्षात मोबाईलला सक्त मनाई

बैठकीदरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी अतुल म्हेत्रे यांनी, मतमोजणी कक्षात नियुक्त कर्मचारी तसेच उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना मोबाईल फोन आणण्यास सक्त मनाई असल्याचे स्पष्ट केले. तसेच नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना व त्यांच्या नियुक्त प्रतिनिधींना ओळखपत्र दिले जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

## उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या मिरजेत

### किशोर जामदार यांचा राष्ट्रवादीत प्रवेश ;कार्यकर्त्यांच्या बैठकीत निर्णय

**सांगली/भूषण मांजरेकरः–**

मिरजेतील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी महापौर किशोरदादा जामदार यांचा अखेर राष्ट्रवादी अजित पवार पक्षात प्रवेश निश्चित झाला आहे. आज बुधवारी कार्यकर्त्यांच्या

बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. उद्या उपमुख्यमंत्री अजितदादा पवार मिरजेत येत असून त्यांच्या प्रमुख उपस्थितीत मेळावा होऊन हा प्रवेश होत आहे. यामुळे राष्ट्रवादी अजित पवार गटाची ताकद मिरज शहरात वाढणार आहे. या प्रवेशामुळे भाजप व विरोधकांना चांगलाच घाम फुटला आहे. महापालिकेमध्ये सत्तेवर



येण्यासाठी भाजपला राष्ट्रवादी शिवसेनेची गरज लागणार आहे. हे लक्षात घेता किशोर जामदार हे किंग मेकर ठरणार आहेत.

गेल्या काही दिवसापासून मिरजेतील काही काँग्रेस, राष्ट्रवादी व भाजपचे नगरसेवक राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा होती. दिनांक १५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस हे सांगली दौऱ्यावर आले असता सांगली दौरा करून ते पुणे येथे गेले. पुणे येथे भाजप राष्ट्रवादी अजित पवार गट ही महायुती नव्हे तर मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर करताच अजित पवार यांनी राज्यातील आपल्या गटाच्या प्रमुख नेते व कार्यकर्त्यांना फोन करून त्यांना पुण्यामध्ये येण्याचे सूचना केल्या. त्यानुसार मिरजेतील किशोर जामदार व भाजपचे काही आजी-माजी नगरसेवक यांनी तत्काळ पुणे येथे गाठून अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीमध्ये त्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याचे मत व्यक्त केले. मात्र, त्यावेळी किशोर जामदार यांनी कार्यकर्त्यांचा निर्णय घेऊन आपला निर्णय घेत असल्याचे सांगितले. त्यानुसार आज बुधवारी मिरजेत किशोर जामदार गटाच्या कार्यकर्ते व नेत्यांची बैठक होऊन त्यामध्ये कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यामध्ये अनेकांनी महायुती ही सत्तेवर आहे, त्यामुळे मिरजेसह महापालिका क्षेत्रात विकास कामे व्हायचे असतील तर किशोरदादा यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करणे हेच योग्य आहे असे मत मांडले. त्यानंतर काही कार्यकर्त्यांनी न जाण्याचा सूचना मांडल्या. अखेर सर्वमताने किशोर जामदार यांनी अजित पवार गटांमध्ये प्रवेश करावा असे स्पष्ट मत मांडले. किशोर जामदार यांनी मी अनेक वर्ष काँग्रेस पक्षाचे काम करत होतो. ज्येष्ठ नेते मदनभाऊ पाटील, आ.विश्वजीत कदम, खा. विशाल पाटील

पान ४ वर

## माजी जिल्हा परिषद सदस्याला मारहाण,दोघांवर गुन्हा दाखल

**कराड/प्रतिनिधी:–**

बनवडी, ता. कराड येथे माजी जिल्हा परिषद सदस्याला दोघांनी मारहाण केली. विनाकारण खुन्नसने का बघतोस आणि गावाला व मला वेठीस का धरतोस, असा जाब विचारल्याच्या कारणावरून मंगळवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

याबाबत सागर भीमराव शिवदास यांनी कराड शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून अख्तरहुसेन आतार व इर्शाद शब्बीर आवटे या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, बनवडी येथील सागर शिवदास हे सोमवारी रात्री मोबाईल पाहत असताना त्यांना एका सोशल मीडिया ग्रुपवर अख्तरहुसेन आतार याने टाकलेली, दोनपेक्षा अधिक अपत्य असल्यास निवडणूक लढता येणार नाही, अशी पोस्ट वाचायला मिळाली. त्यासोबत काही अपशब्दही टाकण्यात आले होते. दुसर्या दिवशी शिवदास हे याबाबत अख्तरहुसेनला जाब विचारण्यासाठी गेले असता, तू मला विचारणारा कोण? तुला ठेवणार नाही, असे म्हणत अख्तरहुसेनने त्यांना शिवीगाळ, दमदाटी केली. त्यावेळी तू मला आणि गावाला वेठीस का धरत आहेस, अशी विचारणा सागर शिवदास यांनी केली. त्यावरून चिडून जाऊन अख्तरहुसेन व इर्शाद आवटे या दोघांनी लोखंडी अँगलने मारहाण केल्याचे सागर शिवदास यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याबाबतची नोंद कराड शहर पोलीस ठाण्यात झाली असून, पोलीस तपास करत आहेत.

# मोरणा गट देसाई गटाचा बालेकिल्ला अभेद्य ठेवा

## पालकमंत्री शंभूराज देसाई ; ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांचा शिंदे सेनेत जाहीर प्रवेश

**पाटण/प्रतिनिधी : –**

पाटण विधानसभा मतदारसंघातील मोरणा विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्ह्याचा पालकमंत्री या नात्याने निधी देण्यात मी कधीही कमी पडलो नाही आणि यापुढेही कमी पडणार नाही. मोरणा विभागातील मतदार अत्यंत साधे, भोळे व प्रामाणिक असून, पडत्या काळातही त्यांनी मला मनापासून साथ दिली आहे. त्यामुळे मोरणा गट हा देसाई गटाचा बालेकिल्ला पूर्वीप्रमाणेच भविष्यातही अभेद्य ठेवण्यासाठी येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांनी संघटितपणे काम करावे, असे आवाहन राज्याचे पर्यटन व खनिकर्म मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

पेठशिवापूर (मोरगिरी), ता. पाटण येथे आयोजित जाहीर मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी पाटणकर गटातील सुनील मोरे, तसेच उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटातील सुरेश पाटील यांनी शिवसेनेत (शिंदे गट) जाहीर प्रवेश केला.

कार्यक्रमास रविराज देसाई यांच्यासह सुग्रा खोंदू, विष्णू देसाई, डी.वाय. पाटील, नथूराम कुंभार, बशीर खोंदू, किसन गालवे, गणेश भिसे, प्रविण पवार, विजय सुर्वे, शिवाजी कोळेकर, संदीप कोळेकर, विलास मोरे, संपत कोळेकर, किशोर गुरव, नथूराम सावंत, विजय पवार, संतोष गिरी, आनंदा मोहिते, अविनाश नाझरे, शामराव पवार, प्रशांत पवार, मधुकर शिंदे आदींसह मोरणा विभागातील प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ना. देसाई म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने पाटण तालुक्याचे नाव महाराष्ट्रभर गाजवले. सन १९५२ ते १९७० या कालावधीत ते पाटण विधानसभा मतदारसंघाचे आमदार व राज्याचे मंत्री होते, तर १९७७ ते १९८० या काळात त्यांनी विधानसभा अध्यक्ष म्हणून प्रभावी कारकीर्द गाजवली. त्यांनी कधीही गटातटाचे राजकारण न करता सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून काम केले. सलग चार पिढ्यांपासून पाटणच्या जनतेची सेवा करणारी हीच देसाई घराण्याची लोकसेवेची परंपरा आहे.

ते म्हणाले, विरोधकांनी टंचाईच्या काळात केवळ देसाई गटाची गावे म्हणून पाणी दिले नाही; मात्र आम्ही कधीही सूडाचे राजकारण केले नाही. जनता दरबारात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाची कामे प्रामाणिकपणे केली जातात. व्यक्तीने मला मतदान केले की नाही, यापेक्षा काम पूर्ण झाल्यानंतर निर्माण होणारा विश्वास महत्त्वाचा आहे. जनतेचा विश्वास मिळवायला पिढ्यानपिढ्या मेहनत घ्यावी लागते.

सन २०२२ नंतर घेतलेल्या भूमिकेवर जनतेने विश्वास ठेवला असून खरी शिवसेना ही ना. एकनाथ शिंदे यांच्याकडेच असल्याचे लोकांनी मान्य केले. आज आपण सत्तेत असून सातारा जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून मी मोरणा भागाच्या विकासासाठी निधी देण्यात कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही देसाई यांनी दिली.

लवकरच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका जाहीर होणार असून इच्छुकांनी आपली राजकीय इच्छा रीतसर नोंदवावी. सर्वानुमते उमेदवारी ठरवून विजयाची क्षमता व सर्वसामान्यांच्या विकासासाठी काम करण्याची पात्रता असणाऱ्यांनाच संधी दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पालकमंत्री कार्यालय 'आपल्या दारी' ही योजना राबवणारा २६१ पाटण विधानसभा मतदारसंघ हा महाराष्ट्रातील एकमेव मतदारसंघ असल्याचे सांगत, या योजनेअंतर्गत ९० गावांतील सुमारे ४ हजार नागरिकांच्या भेटी घेऊन ६२ टक्के कामे पूर्ण झाल्याचे त्यांनी नमूद केले. विरोधक आमच्या योजनांची नक्कल करत असल्याचा टोला



लगावत, विधानसभा निवडणुकीनंतर हे विरोधक कुठे होते, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

शेवटी त्यांनी मोरणा गटातील कार्यकर्त्यांना वैयक्तिक हेवेदावे बाजूला ठेवून एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले. तसेच पक्षात नव्याने प्रवेश केलेल्या सुरेश पाटील, सुनील मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांना 'नवे–जुने' असा भेदभाव न करता सर्वजण खांद्याला खांदा लावून काम करू, अशी स्पष्ट ग्वाही ना. देसाई यांनी दिली.

# कराडमध्ये विजय दिवस समारोह साजरा होत असल्याचा अभिमान

## ब्रिगेडीयर जॉयदिप मुखर्जी ; विविध पुरस्कारांचे वितरण ; १५ माजी सैनिकांचा गौरव

**कराड/प्रतिनिधी : –**

सातारा जिल्ह्याची देशात सैनिकांचा जिल्हा म्हणून ओळख आहे. ही ओळख निर्माण करण्यात कर्नल संभाजीराव पाटील यांचे मोलाचे योगदान आहे. युवकांनी व्यसनांच्या आहारी न जाता देशप्रेमाने प्रेरित होऊन सैन्यदलात भरती व्हावे. १९७१ च्या बांगलादेश मुक्ती संग्रामातील विजय हा भारतीय सैन्यदलाचा देशातील सर्वात मोठा विजय असून, त्याचा समारोह कराडमध्ये होत असल्याचा अभिमान आहे, असे प्रतिपादन ब्रिगेडीयर जॉयदिप मुखर्जी यांनी केले.

विजय दिवस समारोह समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात यंदाचे विविध मानाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये जीवन गौरव यशवंत पुरस्कार जेष्ठ चित्रकार दादासाहेब सुतार यांना, आदर्श माता पुरस्कार साहिराबी सय्यद यांना, आदर्श विद्यार्थीनी पुरस्कार यशवंत हायस्कूलची स्नेहा थोरात हिला, तर महाविद्यालयीन गटातील आदर्श विद्यार्थी पुरस्कार सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालयाच्या आदित्य लट्ठे याला प्रदान करण्यात आला. याचप्रमाणे वीरमाता पुरस्कार विनिता रविंद्र साळुंखे (मसूर) व शीतल संदेश जाधव (हेळगाव) यांना देऊन गौरविण्यात आले. तसेच १९७१ च्या बांगलामुक्ती संग्रामात सहभागी झालेल्या १५ माजी सैनिकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास ब्रिगेडीयर जॉयदिप मुखर्जी, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल सतेश हंगे, लेफ्टनंट कर्नल मंदार जाधव, लेफ्टनंट कर्नल समीर कुलकर्णी, लेफ्टनंट कमांडर दिग्विजय जाधव, अर्बन समूहाचे डॉ. सुभाष एरम, सुभेदार प्रशांत कदम, नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी प्रफुल्ल वनखंडे, विजय दिवस समितीचे सचिव ॲड. संभाजीराव मोहिते, सहसचिव विलासराव जाधव, ऑनररी फ्लाइट लेफ्टनंट बी. जी. जाधव, सलीम मुजावर, चंद्रकांत जाधव, प्रा. जालिंदर काशिद, रत्नाकर शानभाग,



कराड : जीवन गौरव यशवंत पुरस्कार स्वीकारताना जेष्ठ चित्रकार दादासाहेब सुतार. समवेत ब्रिगेडीयर जॉयदिप मुखर्जी, लेफ्टनंट कर्नल सतेश हंगे, डॉ. सुभाष एरम, सलीम मुजावर, ॲड. संभाजीराव मोहिते, मंदार जाधव, समीर कुलकर्णी, दिग्विजय जाधव आदी.

प्रा. महालिंग मुंढेकर, रमेश पवार, प्रा. रजनीश पिसे, राजगोंडा अपिने, प्रा. बी. एस. खोत, रसिका निंबाळकर, प्रा. प्रज्ञा लाड, प्रा. डॉ. स्नेहल राजहंस, ऐश्वर्या पाटणकर यांच्यासह पदाधिकारी, जवान व माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल सतेश हंगे म्हणाले, कर्नल संभाजीराव पाटील यांच्यामुळे कराडच्या विजय दिवस समारोहाला देशपातळीवर महत्त्व प्राप्त झाले आहे. विजय दिवस हा भारतीय सैन्यदलाच्या लष्करी सामर्थ्याचे प्रतीक आहे. सातारा जिल्ह्यात सर्वाधिक सैनिक असून, प्रत्येक महत्त्वाच्या लष्करी कारवाईत सातारा जिल्ह्यातील जवानांचा सहभाग राहिला आहे. जिल्ह्यात शहीद जवानांच्या पत्नींची संख्या ७७२ असून, सैनिक शहीद झाल्यास शासनाकडून एक कोटी रुपयांची मदत दिली जाते. सैनिकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी सैनिक कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. संभाजीराव मोहिते यांनी केले. सूत्रसंचालन महेंद्र भोसले यांनी, तर ऐश्वर्या पाटणकर यांनी आभार मानले.

# महाबळेश्वर पालिका निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

## २० रोजी मतदान ; २१ रोजी मतमोजणी

**प्रतापगड/प्रतिनिधी : –**

महाबळेश्वर नगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले असून, येत्या २० डिसेंबर रोजी होणारी मतदान प्रक्रिया, तसेच २१ डिसेंबर रोजी होणारी मतमोजणी प्रक्रिया निर्विघ्न, पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी सर्वस्तरावर व्यापक तयारी सुरू आहे. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सचिन मस्के यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने नियोजनाला गती दिली असून निवडणूक प्रक्रियेत कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी प्रत्येक बाबीवर काटेकोर लक्ष दिले जात आहे.



सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सीईओ योगेश पाटील आणि पोलीस निरीक्षक सांडभोर यांनी शहरातील विविध मतदान केंद्र परिसरांची प्रत्यक्ष पाहणी करत सुरक्षाव्यवस्था, वाहतूक नियोजन, मतदान कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मतदान साहित्याची साठवणूक व वितरण याबाबत सविस्तर आढावा घेतला. या पाहणीदरम्यान आपत्कालीन परिस्थितीत तातडीच्या उपाययोजना राबवण्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या. मतदान केंद्रांवर मतदारांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष व्यवस्था करण्यात यावी, तसेच कोणतीही आरोग्यविषयक अडचण उद्भवल्यास तत्काळ उपाययोजना करण्यासाठी सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले.

मतदानाच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस यंत्रणेला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणी प्रक्रियेदरम्यान पूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी सीसीटीव्हीच्या देखरेखीखाली, नियंत्रण कक्षामार्फत आणि अधिकृत कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत संपूर्ण प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी सचिन मस्के यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे आणि दक्षतेने पार पाडाव्यात, असे निर्देश देत २० डिसेंबर रोजी मतदारांनी निर्भयपणे व उत्साहाने मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन केले आहे. प्रशासनाच्या या सखोल तयारीमुळे महाबळेश्वर नगरपालिका निवडणूक प्रक्रिया शांततेत, सुरळीत आणि यशस्वीरीत्या पार पडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# स्व. यशवंतराव चव्हाण कृषी प्रदर्शनाच्या मंडप उभारणीस प्रारंभ

## २६ डिसेंबरपासून कराडला भव्य प्रदर्शन ; शेतकऱ्यांच्या ज्ञानात मोलाची भर पडणार: ॲड. पाटील

**कराड/प्रतिनिधी : –**

शेती उत्पन्न बाजार समिती, कराड यांच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणारे स्व. यशवंतराव चव्हाण कृषी प्रदर्शन यंदा २६ ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत कराड येथे भरविण्यात येणार आहे. यंदा या प्रदर्शनाचे २० वे वर्ष असून, कृषी व औद्योगिक क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, नव्या शेती पद्धती आणि यांत्रिकीकरणाच्या संधींचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. या प्रदर्शनाच्या तयारीचा भाग म्हणून मंडप उभारणीचा शुभारंभ बुधवार, दि. १७ रोजी रयत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ड. उदयसिंह पाटील – उंडाळकर यांच्या हस्ते करण्यात आला.



यावेळी बाजार समितीचे सभापती पै. शंकरराव ऊर्फ सतीश इंगवले, उपसभापती नितीन ढापरे, संचालक प्रकाश पाटील, विजयकुमार कदम, संभाजी काकडे, संभाजी चव्हाण, सर्जेराव गुरव, राजेंद्र चव्हाण, जगन्नाथ लावंड, जयंतीभाई पटेल, गणपत पाटील, प्रभारी सचिव आबासो पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी संचालक सर्जेराव गुरव व कोयना बँकेचे संचालक संपतराव बडेकर यांच्या हस्ते विधीवत पूजा करण्यात आली.

शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी भरविलेले देशातील हे एकमेव प्रदर्शन असून, शेतकऱ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आवश्यक असलेले ज्ञान, आधुनिक शेती पद्धती, एआय (–ख) आधारित शेती तंत्रज्ञान, कृषी अवजारे, प्रक्रिया उद्योग व औद्योगिक नवकल्पना यांची माहिती या प्रदर्शनात मिळणार आहे. यासाठी शासनाचा कृषी विभाग, जिल्हा परिषद सातारा, पशुसंवर्धन विभाग, महसूल विभाग, आत्मा विभाग तसेच कराड व मलकापूर नगरपरिषदेचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

मंडपाच्या भूमिपूजनप्रसंगी बोलताना ॲड. उदयसिंह पाटील म्हणाले, शेतकऱ्यांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवून बाजार समिती कार्यरत आहे. या प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांच्या ज्ञानात मोलाची भर पडणार असून शेतीत यांत्रिकीकरणाचा वेग वाढावा, हा प्रमुख उद्देश आहे. यंदा सुमारे ४०० स्टॉल्स या प्रदर्शनात सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मंडप व्यवस्थेबाबत माहिती देताना डायनॅमिक इव्हेंटचे मॅनेजर धीरज तिवारी म्हणाले, पिलरलेस डोममध्ये वॉटरप्रूफ, उंचीचा भव्य मंडप उभारण्यात येणार असून, त्यामुळे मंडपात सतत खेळती हवा राहणार आहे. या मंडपात ४०० स्टॉल्ससह स्वतंत्र पशु–पक्षी दालन, आरोग्य विभागाचे विशेष दालन तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त स्टॉल्स असतील. शेतकरी हित लक्षात घेऊन शेतकरी बांधवांसाठी १०० स्टॉल्स मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मंडप व परिसरात सर्व आवश्यक सोयी–सुविधांची व्यवस्था करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रदीप पाटील, प्रा. धनाजी काटकर, रयत कारखान्याचे व्हा. चेअरमन आप्पासाहेब गरुड, हणमंतराव चव्हाण, खरेदी–विक्री संघाचे चेअरमन अनिल मोहिते, यशवंत बँकेचे चेअरमन महेशकुमार जाधव, कोयना दूध संघाचे व्हा. चेअरमन शिवाजीराव जाधव, स्वा. सै.शामराव पाटील पतसंस्थेचे चेअरमन शहाजी शेवाळे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, माजी पदाधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पवनचक्की केबल चोरी टोळीचा पर्दाफाश

## ५ गुन्हे उघड, १८.८० लाखांचा मुद्देमाल जप्त ; चार आरोपी अटकेत

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा जिल्ह्यातील पवनचक्क्यांमधून तांब्याच्या तार असलेल्या केबल वायरची सातत्याने चोरी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखा, सातारा यांनी भांडाफोड करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत ५ गुन्हे उघडकीस आणून तब्बल १८ लाख ८० हजार १४ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.



दरम्यान, सारीश संजय सावळवाडे (वय २३) रा. आगाशिव नगर, ता. कराड, जि. सातारा (मूळ रा. आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली), दत्तात्रय जगन्नाथ झोरे (वय १९) रा. सडावाघापुर, ता. पाटण, जि. सातारा, निलेश श्रीमंत सूर्यवंशी (वय २७) रा. पाबळवाडी, ता. पाटण, जि. सातारा, प्रमोद सुरेश निकम (वय २६) रा. मसुर, ता. कराड, जि. सातारा या आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

दि. ८ फेब्रुवारी ते दि. ५ ते ६ डिसेंबर २०२५ या कालावधीत सडावाघापुर व सडादाडोली परिसरातील सुझलॉन कंपनीच्या पवनचक्क्यांमधील तांब्याच्या तार असलेल्या केबल वायर चोरीस गेल्याच्या तक्रारी पाटण पोलीस ठाण्यात प्राप्त झाल्या होत्या. याप्रकरणी पाटण पोलीस ठाण्यात गुन्हा अधिनियम कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

यापूर्वीही अशा स्वरूपाच्या चोरीच्या घटना घडल्याने पोलीस अधीक्षक तुषार दोशी व अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर यांनी हे गुन्हे गांभीर्याने घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांना आरोपी शोधून गुन्हे उघडकीस आणण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.

### ५ गुन्हे उघड; १८.८० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

आरोपींकडून खालील ५ गुन्हे उघडकीस आले आहेत. पाटण पोलीस ठाणे : गु.र.नं. १९५/२०२५५, सातारा तालुका पोलीस ठाणे : गु.र.नं. १३१/२०२५ व ४३९/२०२५, उंब्रज पोलीस ठाणे : गु.र.नं. ०५/२०२५ व ३६२/२९२५ या कारवाईत १७,७६,०१४ रुपये किंमतीची केबल वायर व मशीन, १,००,००० रुपये किंमतीचा टेम्पो, वजनकाटा असा एकूण १८,८०,०१४ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी चारही आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या ते पोलीस कोठडीत असून अधिक तपास सुरू आहे.

पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे व रोहित फार्णे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार केले. दि. १४ डिसेंबर २०२५रोजी गोपनीय बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, दत्तात्रय झोरे, सारीश सावळवाडे, निलेश सूर्यवंशी व प्रमोद निकम हे पवनचक्क्यांमधील केबल चोरी करत आहेत. त्यानुसार पथकाने पाटण, मसुर व कराड परिसरातून संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी सडावाघापुर, दाडोली, राजापुरी, पाडेकरवाडी, घाटेवाडी, मालोशी, बामणेवाडी व भांबे या परिसरातील सुझलॉन कंपनीच्या पवनचक्क्यांमधून केबल वायर चोरी केल्याची कबुली दिली.

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक तुषार दोशी व अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस निरीक्षक अरुण देवकर, सपोनि रमेश गर्जे, रोहित फार्णे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदारांनी सहभाग घेतला. या यशस्वी कारवाईबद्दल पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

# कराड पालिका निवडणूक मतमोजणीची तयारी पूर्ण

पान १ वरुन

मतमोजणीच्या नियोजनाबाबत माहिती देताना ते म्हणाले, एकूण १५ टेबलवर मतमोजणी होणार असून, साधारण चार ते पाच राऊंडमध्ये मतमोजणी पूर्ण होईल. यासाठी सुमारे ६५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त प्रत्येक उमेदवाराचा एक प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी कक्षात उपस्थित राहणार आहे. अध्यक्षपदासाठी प्रत्येक प्रभागासाठी एक प्रतिनिधी असणार आहे.

दरम्यान, प्रभाग क्रमांक १५ (ब) साठी पुढे ढकलण्यात आलेल्या मतदानाकरिता आठ ईव्हीएम मशिन्स तयार ठेवण्यात आल्या असून, तीन मशिन्स राखीव ठेवण्यात आल्याची माहिती निवडणूक कक्षातून देण्यात आली.

# अस्तित्व लपवल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा शहर हद्दीत संशयास्पद हालचाली करत स्वत:चे अस्तित्व लपवून गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याच्या आरोपाखाली दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महेश रमेश माने (वय ४८, रा. शनिवार पेठ, सातारा) हा रिमांड होम शेजारील इदगाह मैदान परिसरात चेहरा झाकून मोकळ्या जागेत संशयास्पदरीत्या बसलेला आढळून आला. पोलिस पेट्रोलिंगदरम्यान ही बाब निदर्शनास आल्यानंतर त्याच्यावर कारवाई करण्यात आली. तसेच संजीवन हॉस्पिटलसमोरील शॉपिंग सेंटर परिसरात एका दुकानाच्या आडोशाला बसलेला ओमकार सुरेंद्र पासवान (वय २८, रा. तन्वी प्लाझा, करवीर, कोल्हापूर) हा देखील गुन्हा करण्याच्या उद्देशाने बसल्याचे आढळून आले.

दोघांविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबतचा अधिक तपास पोलीस हवालदार महांगडे व पोलीस नाईक मोहिते करत आहेत.

# मल्हारपेठ–पंढरपूर रस्त्याच्या कामाविरोधात बाधित शेतकरी आक्रमक

## मोबदल्याची मागणी ; अंतवडीतील शेतकऱ्यांचे बांधकाम विभागाला निवेदन, आंदोलनाचा इशारा

**कराड/प्रतिनिधी : –**

मल्हारपेठ – पंढरपूर या राज्य मार्गाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग (कराड उत्तर) यांच्याकडून सध्या सुरू आहे. मात्र अंतवडी (ता. कराड) गावाच्या हद्दीतील शेतकऱ्यांच्या जमिनी विना परवानगी व कोणताही मोबदला न देता रस्त्याच्या कामासाठी वापरल्या जात असल्याचा आरोप करीत बाधित शेतकरी आक्रमक झाले आहेत. योग्य मोबदला व शासनाच्या नियमानुसार लाभ न दिल्यास रस्त्याचे काम बंद पाडण्यासह कायदेशीर मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

पंढरपूर – मल्हारपेठ रस्त्याच्या कामामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित होत आहेत. मात्र या जमिनींसाठी शासनाकडून अद्याप कोणताही आर्थिक मोबदला अथवा नियमानुसार मिळणाऱ्या



सुविधा देण्यात आलेल्या नाहीत. हा शेतकऱ्यांवर अन्याय असल्याचे सांगत बुधवारी अंतवडीतील शेतकऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग (कराड उत्तर) कार्यालयात जाऊन मागण्यांचे इशारा वजा निवेदन सादर केले.

या निवेदनात म्हटले आहे की, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेल्या शेतजमिनींवर बांधकाम विभागाकडून बेकायदेशीर अतिक्रमण करून काम सुरू आहे. राज्याच्या विकासासाठी आम्ही सहकार्य करण्यास तयार आहोत; मात्र शासनाने प्रथम बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार योग्य आर्थिक मोबदला अथवा लागू असलेल्या सुविधा द्याव्यात, त्यानंतरच रस्त्याचे काम सुरू करावे, अशी ठाम भूमिका शेतकऱ्यांनी मांडली आहे.

योग्य न्याय न मिळाल्यास रस्त्याचे काम थांबविण्याबरोबरच कायदेशीर व आंदोलक कार्यवाही करण्यात येईल. तसेच मोबदला न देता काम सुरू ठेवल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित विभागावर राहील, असा स्पष्ट इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनावर सुभाष शिंदे, मधुकर शिंदे, विजय शिंदे, गजानन शिंदे, अनिल वाघमारे, महादेव शिंदे, एकनाथ शिंदे, प्रितेश शिंदे, अशोक शिंदे, अजित पवार, संभाजी शिंदे, बाळकृष्ण शिंदे आदी शेतकऱ्यांच्या सह्या आहेत. निवेदनाची प्रत सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, प्रांताधिकारी कराड तसेच तहसीलदार व न्याय दंडाधिकारी कराड यांना पाठविण्यात आली आहे.

# मलकापूर नगरपालिका निवडणूक मतमोजणीची तयारी पूर्ण

**कराड/प्रतिनिधी : –**

मलकापूर नगरपालिका निवडणुकीच्या मतमोजणीसाठी सर्व तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी कल्पना ढवळे यांनी दिली.

मतमोजणीच्या नियोजनाबाबत माहिती देताना कल्पना ढवळे म्हणाल्या, एकूण १२ टेबलवर मतमोजणी होणार असून, साधारण ३ राऊंडमध्ये मतमोजणी पूर्ण होईल. यासाठी सुमारे ९० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त प्रत्येक उमेदवार स्वतः व त्यांचा एक प्रतिनिधी मतमोजणी प्रतिनिधी कक्षात उपस्थित राहणार आहे.




अध्यक्षपदासाठी प्रत्येक प्रभागासाठी एक प्रतिनिधी असणार आहे. दरम्यान, प्रभाग आठ (अ) साठी पुढे ढकलण्यात आलेल्या मतदानाकरिता ईव्हीएम मशिन्स तयार ठेवण्यात आल्या आहेत.

मतमोजणी कक्षात मोबाईलला सक्त मनाई करण्यात आली आहे. मतमोजणीचे ठिकाण कराड येथील दैत्य निवारणी मंदिराशेजारी असलेल्या पंचायत समितीच्या बचतभवन येथे होणार आहे. १२ वाजेपर्यंत मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईल.

# प्रशांत कदम यांचा विजय दिवस समारोह समितीकडून गौरव

**कराड/प्रतिनिधी : –**

विजय दिवस समारोह समितीच्या वतीने कराड येथे आयोजित महासैनिक संमेलनात माजी सैनिक प्रशांत कदम यांचा विशेष सन्मान करण्यात आला. १९७१ च्या बांगला मुक्तिसंग्रामातील योगदान, तसेच सेवानिवृत्तीनंतरही सैनिक व सैनिक कुटुंबीयांच्या समस्यांसाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेऊन हा गौरव करण्यात आला.

या संमेलनात सैनिक पत्नी विनिता रवींद्र साळुंखे (मसूर) आणि शीतल संदेश जाधव (हेळगाव) यांना सैनिक पत्नी पुरस्कार प्रदान करण्यात आला. याचप्रमाणे १९७१ च्या भारत–पाकिस्तान युद्धात सहभागी झालेल्या माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. तसेच या युद्धात शहीद झालेल्या जवानांच्या वीरपत्नी व कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास ब्रिगेडियर जॉयदीप मुखर्जी (कमांडंट, बेळगाव इन्फंट्री ट्रेनिंग सेंटर), कर्नल सतेश हंगे (उपसंचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे), ले. कर्नल मंदार जाधव, ले. कर्नल समीर कुलकर्णी, ले. कमांडर दिग्विजय जाधव (कराड कॅन्टीन मॅनेजर), अर्बन समूहाचे डॉ. सुभाष एरम, विजय दिवस समारोह समितीचे सचिव ड. संभाजीराव मोहिते, सहसचिव सुभेदार विलास जाधव, निवृत्त सुभेदार मेजर पी. ए. जगताप यांच्यासह राज्य व जिल्ह्यातील विविध माजी सैनिक संघटनांचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने माजी सैनिक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना ड. मोहिते म्हणाले, विजय दिवसाच्या निमित्ताने महासैनिक संमेलनाचे आयोजन करून १९७१ च्या युद्धातील



माजी सैनिकांचा सन्मान, तसेच वीरगतीस प्राप्त झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांचे स्मरण व गौरव करणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. सेवानिवृत्तीनंतरही समाज व सैनिक परिवारासाठी कार्यरत असलेल्या माजी सैनिकांचा सन्मान करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. माजी सैनिक प्रशांत कदम, शासकीय जिल्हा संरक्षण समितीचे सदस्य म्हणून, सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या समस्या शासन दरबारी व समाजपातळीवर सोडवण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करत आहेत.

ब्रिगेडियर जॉयदीप मुखर्जी यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन केले. मनोगतात कर्नल सतेश हंगे यांनी, नि. कर्नल संभाजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली विजय दिवस समारोह समितीच्या प्रयत्नांमुळे कराडमध्ये हा विजय दिवस सातत्याने साजरा होत आहे. त्यांनी सैनिक कल्याण विभागामार्फत माजी सैनिक, शहीद जवानांचे कुटुंबीय व त्यांच्या आश्रितांना मिळणाऱ्या विविध सुविधांची सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी विजय दिवसाच्या माध्यमातून देशसेवेसाठी योगदान देणाऱ्या सर्व सैनिकांना अभिवादन केले.

# शिवराज मानेला महाराष्ट्र राज्य कराटे स्पर्धेत दुहेरी कांस्य पदक

**कराड/प्रतिनिधी : –**

जपान कराटे असोसिएशन इंडिया यांच्या वतीने आयोजित ४२ वी महाराष्ट्र राज्य कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा दि. १४ डिसेंबर २०२५ रोजी गार्सिया कॉलेज, वसई (मुंबई) येथे उत्साहात पार पडली. या राज्यस्तरीय स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.

या स्पर्धेत कराड येथील शिवराज माने या गुणवंत खेळाडूने उल्लेखनीय कामगिरी करत काता प्रकारात कांस्य पदक तसेच कुमिते प्रकारात कांस्य पदक पटकावले. खुल्या वयोगटात उत्कृष्ट खेळ सादर करत त्याने महाराष्ट्र राज्यात तिसरा क्रमांक मिळवून कांस्यपदकाचा मान मिळवला आहे.

शिवराज माने हा संगम हेल्थ क्लब येथे प्रशिक्षण घेत असून, त्याला वीरेंद्र परदेशी यांचे मार्गदर्शन लाभले.



या यशाच्या जोरावर त्याची राष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली असून, कराडसह सातारा जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.

यापूर्वी सातारा येथे झालेल्या कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत शिवराजने दोन सुवर्णपदके जिंकत राज्यस्तरीय विजेतेपद पटकावले होते. यावेळीही त्याने आपली सातत्यपूर्ण कामगिरी कायम ठेवत यशाचा आलेख उंचावला आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शिवराज माने याचे क्रीडाप्रेमी, प्रशिक्षक, मित्रपरिवार तसेच विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# संतोष नाईक यांना नवनीत एज्युकेशन लिमिटेड तर्फे नवनीत सन्मान अर्पण

**विटा/प्रतिनिधी:–**

अगस्ती विद्यालय, अगस्तीनगरचे एक उपक्रमशील मुख्याध्यापक संतोष तुकाराम नाईक यांना राज्य शासनाचा सन २०२४ – २०२५ चा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले शिक्षक गुणगौरव पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. श्री नवनीत एज्युकेशन लिमिटेडतर्फे नवनीत सन्मान हा पुरस्कार अर्पण करण्यात आला.



नवनीत एज्युकेशन लिमिटेडचे सांगली जिल्ह्याचे एरिया मॅनेजर बबन ढोले व एज्युकेटेड ऑफिसर, सांगली संदीप पाटील यांनी अगस्ती विद्यालय अगस्तीनगर येथे येऊन नाईक सरांना त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल तसेच मुख्यमंत्री स्वच्छ सुंदर शाळा अभियानातील सांगली जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाचे विद्यालय तसेच ग्रामीण भागातील सर्व सोयी नियुक्त असे आय.एस.ओ. मानांकन प्राप्त विद्यालय, संत सोपान काका सहकारी बँकेतर्फे सांगली जिल्ह्यातील स्वच्छ सुंदर शाळेमध्ये प्रथम क्रमांकाचे विद्यालय असे अनेक आदर्श विद्यालय म्हणून या विद्यालयाला पुरस्कार प्रदान झाले आहेत.

ग्रामविकास शिक्षण संस्था, अगस्तीनगरचे अध्यक्ष बाळासाहेब जाधव भाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली व आदर्श मुख्याध्यापक संतोष नाईक यांच्या कुशल प्रशासनाच्या माध्यमातून सर्व पालक वर्ग, आजी माजी विद्यार्थी, सर्व आदर्श शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या माध्यमातून विद्यालयाची दिवसेंदिवस यशस्वी वाटचाल सुरू आहे. कला, क्रीडा, सांस्कृतिक, विद्यार्थी गुणवत्ता यामध्ये अशीच विद्यालयाची घोडदौड सुरू राहावी, अशा शुभेच्छा नवनीत एज्युकेशन लिमिटेडचे संचालक सारंग बाला यांनी आपल्या सन्मानपत्रामध्ये नमूद केले आहे.

नवनीत एज्युकेशन लिमिटेड च्या या नवनीत सन्मान या पुरस्काराने नाईक सरांचे सर्वच माध्यमातून कौतुक होत आहे. तसेच यापुढेही असेच पुरस्कार घेऊन विद्यालयाचे नावलौकिक वाढवावे असे मनोगत बबन ढोले यांनी व्यक्त केले.

# विज्ञान प्रदर्शनाने विद्यार्थ्यांत जिज्ञासा वाढते

## डॉ.विठ्ठल शिवणकर

**सांगली/ प्रतिनिधी:–**

अध्ययन अध्यापनाबरोबरच विद्यार्थ्यांच्या प्रयोगात्मक कृतिला वाव दिल्यास त्यांच्यातील जिज्ञासा आणि चिकित्सक वृत्ती वाढीस लागेल असे मत बळवंत कॉलेजचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ज्युनिअर विभागात आयोजित केलेल्या 'बळवंत विश्व' अंतर्गत 'विज्ञान प्रदर्शनाच्या' उदघाटन प्रसंगी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी उपप्रचार्य प्रा. डॉ. बोबडे, प्रा. डॉ. मरे, पर्यवेक्षक सर्जेराव सावंत, प्रा. राहुल पाटील, असीम मुजावर



उपस्थित होते.

डॉ. शिवणकर पुढे म्हणाले, विद्यार्थ्याला पुस्तकातील संकल्पना अधिक स्पष्ट करून सांगताना दैनंदिन उदाहरणांबरोबरच विद्यार्थ्यांची विचार क्षमता, चौकस आणि शोधकवृत्ती वृद्धिंगत होण्यासाठी अशा विज्ञान प्रदर्शनाची गरज असल्याचे सांगितले. प्रदर्शनात प्रयोग विभागात ६० तर विज्ञान खेळणी विभागात ४५ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती. मेघा जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. राम मुजमुले यांनी तर आभार श्रीमती. सत्यभामा जाधव यांनी मानले. परीक्षक म्हणून प्रा. राहुल पाटील, प्रा. नेताजी पाटील, प्रा. सरतापे यांनी काम पाहिले. कार्यक्रमास अजित साळुंखे, संताजी सावंत, दिलीप जाधव सविता बनसोडे, महादेव कनप आदि उपस्थित होते. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी तेजस्विनी पवार, अपर्णा पाटील, ओंकार शिंदे, ओंकार कुंभार, गणेश जगताप, सागर सावंत,शीतल सावंत, शुभांगी साळुंखे श्रीमती. सदामते, सुयोग सूर्यवंशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# साकुर्डी येथे कृषिकन्यांचे उत्साहात स्वागत

**कराड/प्रतिनिधी : –**

यशवंतराव चव्हाण शासकीय कृषी महाविद्यालय, कराड येथील चतुर्थ वर्षातील कृषिकन्यांचे साकुर्डी (ता. कराड) येथे ग्रामस्थांच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. ग्रामीण भागातील शेती, शेतकरी व त्यांच्या जीवनाशी प्रत्यक्ष संवाद साधत अभ्यास करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या स्वागत कार्यक्रमास सरपंच काशिनाथ जाधव, उपसरपंच सुभाष निकम, ग्रामसेविका वर्षा पवार, माजी सरपंच विश्वास कणसे, वैभव कणसे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत कृषिकन्या प्राजक्ता दुपडे, सुमेधा कांबळे, सिद्धी डमरे, विनश्री काळे, श्रुतिका गोफणे, नमिता जेधे, राधिका जाधव व ऋतुजा देवकर या साकुर्डी गावात वास्तव्यास राहून सर्वेक्षण करणार आहेत. या दरम्यान शेतकऱ्यांचे जीवनमान, सामाजिक व आर्थिक स्थिती, पीक पद्धती, नैसर्गिक संसाधनांचा वापर आदी विषयांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

तसेच शेतकऱ्यांना माती व पाणी परीक्षणाचे महत्त्व, विविध पिकांवरील रोग व किडींचे व्यवस्थापन, हवामान बदलांचा शेतीवर होणारा परिणाम तसेच



आधुनिक कृषी तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ होऊन शेती अधिक शाश्वत व उत्पादनक्षम होण्यास मदत होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

या उपक्रमासाठी यशवंतराव चव्हाण शासकीय कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. इंदिरा घोनमोडे, केंद्र प्रमुख डॉ. राणी निंबाळकर, डॉ. दत्तात्रय मुरूमकर, डॉ. योगेश कांदळकर, डॉ. अर्चना मोहिते, डॉ. धनंजय नावडकर, डॉ. नंदकिशोर टाले तसेच विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन कृषिकन्यांना लाभत आहे.

# महाडिक कॉलेजची श्रेया मरळेची इंडियन एअर फोर्स मध्ये निवड

**ईश्वरपूर/प्रतिनिधी:–**

नानासाहेब महाडिक पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट, पेठ येथील तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग डिप्लोमा या विभागातील विद्यार्थिनी कु.श्रेया विलास मरळे हिची इंडियन एअर फोर्स मध्ये निवड झाल्याबद्दल तिचा व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ.महेश जोशी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी डॉ.महेश जोशी म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील असते. विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाबरोबरच त्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी महाविद्यालय नेहमी प्रोत्साहन देते, त्याचाच भाग म्हणून स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून



कु.श्रेया मरळे हिची इंडियन एअर फोर्स मध्ये निवड झालेली आहे. निश्चितच तिची निवड कॉलेज साठी एक अभिमानास्पद बाब आहे.

कु.श्रेया मरळे हिने कॉलेजच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. ऑनलाईन परीक्षा, तसेच वैद्यकीय चाचणी अशा सर्व चाचण्यामधून चांगल्या मेरीटनी उत्तीर्ण होऊन तिने हे यश संपादन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.सी. बी. पाटील, प्रा. विनोद कापसे, प्रा. किशोर शिंदे, प्रा.चंद्रकांत गावडे व सर्व विभाग प्रमुख, शिक्षक उपस्थित होते

# जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत तन्वी क्षीरसागर द्वितीय

**कराड/प्रतिनिधी:–**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यशवंतनगर येथील विद्यार्थिनी तन्वी संतोष क्षीरसागर हिने स्व. खाशाबा जाधव जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला.

म्हसवडमधील सिद्धनाथ मेगासिटीत स्व.खाशाबा जाधव जिल्हास्तरीय मुलींच्या कुस्ती स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत इयत्ता चौथीची विद्यार्थिनी तन्वी क्षीरसागर हिने वीस किलो वजनी गटात यश संपादन केले. माण पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री. पिसे, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती संगीता



म्हसवड:कुस्ती स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थिनींना पारितोषिक वितरणप्रसंगी उपस्थित मान्यवर

गायकवाड यांच्या हस्ते तन्वीला पारितोषिक देण्यात आले. तन्वीच्या या यशाबद्दल कराड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बिपीन मोरे, शिक्षण विस्तार अधिकारी श्री.कांबळे, केंद्रप्रमुख मधुसूदन सोनवणे, सरपंच सुमय्या मोमीन, उपसरपंच विकास चव्हाण, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रियांका कदम, उपाध्यक्ष महेश चव्हाण यांनी अभिनंदन केले. मुख्याध्यापक शंकर देसाई व शिक्षक सचिन ढमाळ यांनी तिला स्पर्धेसाठी मार्गदर्शन केले.

# दूर्वा नेमाडे हिचे क्रीडा स्पर्धेत यश

**कोळे/प्रतिनिधी : –**

कराड तालुकास्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत जि.प. प्राथमिक शाळा, कोळेवाडी येथील दिव्यांग विद्यार्थिनी दुर्वा दिग्विजय नेमाने हिने उत्कृष्ट कामगिरीची छाप पाडत ५० मीटर धाव आणि सॉफ्ट बॉल थ्रो या दोन्ही क्रीडा प्रकारांत द्वितीय क्रमांक पटकावत दुहेरी यश संपादन केले.



जन्मतः असलेल्या अडचणींवर मात करत सातत्यपूर्ण सराव, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर दुर्वाने हे यश मिळवले. दिव्यांग असूनही कोणताही न्यूनगंड न बाळगता तिने दोन्ही स्पर्धांमध्ये आत्मविश्वासाने सहभाग घेत उल्लेखनीय कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या या यशामुळे इतर दिव्यांग विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली आहे.

दुर्वाच्या यशामागे शाळेतील दिव्यांग क्लबचे उपक्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहन हे घटक महत्त्वाचे ठरले. तसेच शाळेतील परसबाग संवर्धन, स्वच्छता उपक्रम, विविध शालेय खेळ आणि अभ्यासिक उपक्रमांत तिचा उत्स्फूर्त सहभाग तिचा सकारात्मक दृष्टिकोन अधोरेखित करतो.

याच स्पर्धेत यशराज चव्हाण या विद्यार्थ्याने रस्सीखेच स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून शाळेचा मान वाढवला. दुर्वा आणि यशराजच्या या उल्लेखनीय यशाबद्दल जि. प. प्राथमिक शाळा, कोळेवाडीचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग तसेच ग्रामस्थांनी दोघांचेही अभिनंदन करत कौतुकाचा वर्षाव केला.

# उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या मिरजेत

पान १ वरुन

यांच्याबरोबर मी काम केले आहे. काँग्रेस पक्षाने माझ्यासाठी भरपूर दिले आहे. मात्र सध्याची परिस्थिती बघता मिरज शहर व महापालिकेचा विकास घडवायचे असेल तर राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करणे हेच उचित असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे पटले. त्यामुळे मी राष्ट्रवादीत प्रवेश करीत असल्याचे त्यांनी जाहीर जाहीर केले. उद्या शुक्रवार दिनांक १९ डिसेंबर रोजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे मिरज दौऱ्यावर येत आहे. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत किशोरदादा जामदार व त्यांचा पूर्ण गट राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करत आहेत. या प्रवेशामुळे राष्ट्रवादी ताकद वाढणार आहे. हा प्रवेश होणार असल्याने भाजप व विरोधकांना चांगलाच घाम फुटला आहे. भाजपला सत्तेवर येण्यासाठी महायुतीतील घटक पक्षांची गरज लागणार आहे. यावेळी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे सहकार्य घेतल्याशिवाय त्यांना सत्तेवर जाता येणार नाही. हे पाहता किशोर जामदार हे किंगमेकर ठरणार एवढे मात्र निश्चित.



# विटा हायस्कूल, विटा येथे विविध गुणदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**विटा /प्रतिनिधी:–**

विटा हायस्कूल येथे बुधवार दि. १० डिसेंबर रोजी विद्यालयामध्ये विविध गुणदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी रयत शिक्षण संस्था, दक्षिण विभाग माजी अध्यक्ष माधवराव दादा मोहिते, स्कूल कमिटी सदस्य सुभाष बापू पाटील, विद्यालयाचे प्राचार्य जाधव एच. एस., उपमुख्याध्यापक काळे ए. जे., पर्यवेक्षक माने व पर्यवेक्षिका सौ. रासकर मॅडम, ज्येष्ठ पत्रकार शिराजभाई शिकलगार, पालक प्रतिनिधी यांच्या समवेत मान्यवरांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

सुरुवातीला कर्मवीर आण्णा व लक्ष्मी वहिनी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्राचार्य जाधव एच. एस. सरांनी श्रीफळ वाढवून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. उद्घाटन प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना कलागुणांना वाव देण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन घेत असताना विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर इयत्ता पाचवी ते नववीच्या गटातील विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन कार्यक्रम सादर केला. त्यामध्ये शास्त्रीय नृत्य, देशभक्तीपर गीत, रेकॉर्ड डान्स, गोंधळ गीत पोतराज गीत, नाटक, एकांकिका इत्यादी विविध प्रकार सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. बाळीकाई ए. एस. व सौ. पाटील एम. ए. यांनी केले. शेवटी सुतार ए. टी. यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी पालकांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. अशा पद्धतीने विविध कलागुण दर्शनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहात संपन्न झाला.

# न्यू इंग्लिश स्कूल स्वच्छ शाळा सुंदर शाळा स्पर्धेत द्वितीय

**ईश्वरपूर/प्रतिनिधी : –**

पेठ, ता. वाळवा येथील कासेगाव शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलचा संत सोपानकाका फौंडेशन सासवडच्या वतीने स्वच्छ शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत करण्यात आलेल्या परिक्षणात तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. प्रा अजित डवरी यांच्या हस्ते शिल्ड, प्रमाणपत्र व रोख दोन हजार रुपये देऊन मुख्याध्यापक एस.बी. माने यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी शालेय परिसराची स्वच्छता ठेवणारे सेवक सुहास कुंभार, गुंडाभाऊ जाधव, संग्राम पाटील, सक्षम सावंत यांचा मान्यवरांच्या हस्ते, तसेच



संस्थेच्या क्रीडा विभागाच्या उपप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल आर.पी. मोहिते यांचा उपअधीक्षक एस.एल. माने यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी एस.पी. डबाणे, प्रकाश गावडे, एम.बी.भोपळे,प्रा. अंकुश पवार, नयना वळीव, वर्षाराणी बंडगर, अर्चना ढवळीकर, शिला माळी, नलिनी पाटील, भारती गावित, एस.एम. नलवडे, मनिषा पाटील, राणी जामदार, चंद्रकांत खाडे, माधुरी पाटील यांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक एन.डी. पाटील यांनी केले. धनंजय बामणे यांनी आभार मानले.


## आज का अंदाज

गुरुवार दिनांक १८ डिसेंबर २०२५

| कल्याण बाजार | मुंबई बाजार |
|---|---|
| 'पत्थर फोड एकच' | 'पत्थर फोड एकच' |
| २ - ३ - ६ - ९ | २ - ५ - ६ - ७ |
| १३८-१५७-२४०-१२६ | १४७-३६६-१५०-२२३ |
| ३४५-३३७-३६७-२८९ | ३९०-१२२-२४०-३७७ |
| २००-६७०-४६६-३७९ | २००-५००-३३०-४४९ |
| जोडी | जोडी |
| २४ - ३४ - ६१ - ९१ | २४ - ५४ - ६१ - ७१ |
| २५ - ३५ - ६० - ९० | २८ - ५८ - ६३ - ७३ |
| २७ - ३७ - ६८ - ९८ | २० - ५० - ६९ - ७९ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि.१८-१९ डिसेंबर
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

गुरुवार दिनांक १८ डिसेंबर २०२५

सर्व बाजार साठी

१५ - ४५ - ७२ - ८२
१६ - ४६ - ७३ - ८३
१९ - ४९ - ७० - ८०

५६० - ११२ - १७९ - १८९
६७८ - २५७ - ३५९ - ३७८
४७० - ७८९ - २५० - २२४

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

## नशिबाची परीक्षा

गुरुवार १८ डिसेंबर २०२५

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ३-८-९ मजबुत

120 230
670 3-5 258
337 122

जोड 36-75-81-29-54

### कल्याणम

उदय-अस्त | सिंगल ६-४-७ मजबुत

123 156
169 6-2 129
114 110

जोड 60-32-41-57-29

### मुंबैम ( मेन )

उदय-अस्त | सिंगल ८-५-९ मजबुत

125 128
260 8-1 290
440 227

जोड 86-21-53-49-10

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

| सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन डे | सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन नाईट |
|---|---|
| १३९ २३८ ३३७ **३** ६०० ५५६ २४० **६** ३७० ४६० ५५० **०** | २८८ ३५० १३४ **८** १७९ २७८ ३७७ **७** ६९० ५०० ७८० **५** |

| सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज डे | सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज नाईट |
|---|---|
| ४४६ ६९९ २६६ **४** १५९ २५८ ३५७ **५** ११४ २७७ ३३० **६** | १३८ ३४५ ४८० **२** १७० ३७८ २३३ **८** १२६ २८९ ३६० **९** |

| सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन डे | सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन नाईट |
|---|---|
| २३८ ५८० ४९० **३** १२४ २५० ३४० **७** ५७७ १४४ २७० **९** | २३५ ४७९ ३८९ **०** १०० ३९९ २९० **१** २५५ ११९ ३०० **२** |

| सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज डे | सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज नाईट |
|---|---|
| ५६० ६७८ २२७ **१** ३६६ ४४७ १२२ **५** २७ ४६८ ३६९ **८** | १५७ ४९० २२९ **३** ६८० ३३८ ४०० **४** १४० २५८ ३९९ **५** |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

४ - ६ - ८ - ५
७

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. १५-१२-२०२५ १७-१२-२०२५ १९-१२-२०२५
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई

## आयुक्त सत्यम गांधी:नाकाबंदीसाठी पथके स्थापन ;एक खिडकी योजना सुरू

**सांगली/ प्रतिनिधी:–**

महापालिकेच्या निवडणुकीची त्यामुळे आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई केली जाईल, यासाठी कार्यालय नेमले असून पथकांची स्थापना देखील केली असल्याची माहिती आयुक्त सत्यम गांधी यांनी दिली. तसेच उमेदवारांना ऑफलाईन अर्ज भरण्याची मुभा असून 'ना हरकत प्रमाणपत्रासाठी एक खिडकी योजना, उमेदवारांच्या खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा देखील उभी केली असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

निवडणुकीच्या तयारीबाबत आयुक्त सत्यम गांधी यांनी माहिती दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, उपायुक्त स्मृती पाटील, अश्विनी पाटील उपस्थित होत्या. सत्यम गांधी म्हणाले, निवडणुकीची अधिसूचना १८ डिसेंबरला जारी केली जाणार आहे. त्यानंतर २३ डिसेंबरपासून प्रत्यक्षात अर्ज दाखल करण्यास सुरुवात होईल, उमेदवारांना ऑफलाईन अर्ज भरता येणार आहे. विभागीय आयुक्तांच्या



आदेशाने सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या झाल्या आहेत. उपजिल्हाधिकारी

विजया यादव यांची प्रभाग १,२,८ या तीन प्रभागांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. या तीन प्रभागाचे कामकाज कुपवाड विभागीय कार्यालयात होणार आहे. प्रभाग ३,४,६ साठी सविता लष्करे, प्रभाग ५,७,२० साठी प्रमोद कदम, प्रभाग १५,१७,१८,१९ साठी विवेक काळे, प्रभाग १२,१३,१४,१६ साठी विशाल यादव, प्रभाग ९,१०,११ साठी समाधान शेडगे यांची नियुक्ती केली आहे. मिरज विभागीय कार्यालय, बालगंधर्व नाट्यगृह, प्रभाग समिती दोन, अग्निशमन कार्यालय माळबंगला, तरुण भारत क्रीडांगण येथे निवडणूक कार्यालये सुरू केली आहेत. तर महापालिका निवडणुकीसाठी लागू झालेल्या आचारसंहितेचे काटेकोर पालन होण्यासाठी तरुण भारत क्रीडांगण येथे आचारसंहिता कक्ष तयार केली आहे. निवडणूक प्रचारादरम्यानच्या घडामोडी, घटना, प्रचारफेऱ्या, सभा तसेच उमेदवारांच्या खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी व्हिडिओग्राफी पथक तयार आहे. आचारसंहितेचे पालन न करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्याचे काम सहा भरारी पथके तयार केली असल्याचे आयुक्त गांधी यांनी सांगितले. दि. १ जुलै २०२५ ची मतदार यादी ग्राह्य धरण्यात आली आहे. लवकरच मतदान केंद्राची यादीही प्रसिद्ध केली जाईल,

**राजकीय पक्षांची डिजीटल, झेंडे हटवले**

महापालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाल्यानंतर मनपाच्या पथकाने मनपा क्षेत्रातील ३९ राजकीय बोर्ड, २७४ बॅनर तर ३३ झेंडे हटविले, प्रभाग क्रमांक एकमध्ये ७६ फलक व झेंडे, प्रभाग दोनमध्ये ६६, प्रभाग क्रमांक तीनमध्ये १७० तर प्रभाग क्रमांक चारमध्ये ३४ बॅनर, झेंडे मनपाच्या पथकाने काढून टाकली. निवडणुकीसाठी जवळपास ५४५ ते ५६० मतदान केंद्रे असतील. अंतिम मतदार यादी विक्रीसाठी अभिलेख विभागात ठेवण्यात आली आहेत. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना कार्यालयेही उपलब्ध करून देण्यात आली आहेत. मतदानासाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

**मिरजेत ईव्हीएम ठेवणार, मतमोजणी तिथेच**

महापालिकेच्या



निवडणुकीसाठी लवकरच ईव्हीएम यंत्रे मिळणार आहेत. त्यानंतर राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीसमोर सादरीकरण करून मशिन सील केली जाणार आहेत. मतदान झाल्यानंतरदेखील मिरज येथील शासकीय गोदामातच इंव्हिएममशिन्स ठेवल्या जाणार आहेत. मतमोजणी देखील याच ठिकाणी होणार आहे.



# नाडोलीत राहत्या घरास आग

## पालकमंत्री ना. शंभूराज देसाईंची घटनास्थळी धाव

**चरेगाव/प्रतिनिधी:–**

महाराष्ट्र राज्याचे पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री तसेच सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी आज नाडोली येथे झालेल्या आकस्मित आगीच्या दुर्घटनेची तात्काळ दखल घेतली.

नाडोली येथील दत्तात्रय मंगे,अरविंद मंगे,शंकर मंगे,दिनकर मंगे यांच्या राहत्या घरास दिनांक १७ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे ३.०० वाजता अचानक आग लागली. या आगीत घरातील सर्व संसारोपयोगी वस्तू जळून खाक झाल्या असून मंगे कुटुंबीयांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व कुटुंबीयांची आपुलकीने विचारपूस केली.

या वेळी पालकमंत्र्यांनी शासनाच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मंगे कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच संसारोपयोगी साहित्य,कपडे,ब्लँकेट,चटई व इतर आवश्यक वस्तू तात्काळ उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट आदेश दिले.या कठीण प्रसंगी मंगे कुटुंबीयांना धीर देत काळजी करू नका, मी तुमच्यासोबत आहेअसे आश्वासन पालकमंत्री यांनी दिले.

# सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या समाधीस्थळी विजय दिनी अभिवादन

**कराड/प्रतिनिधी : –**

विजय दिवसाच्या निमित्ताने तळबीड, ता. कराड येथील सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या समाधीस्थळी विजय दिवस समारोह समितीच्यावतीने भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय सैन्यदलाचे ब्रिगेडीयर जॉयदिप मुखर्जी, लेफ्टनंट कर्नल मंदार जाधव, लेफ्टनंट कर्नल समीर कुलकर्णी यांच्यासह मान्यवरांनी समाधिस्थळी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमास विजय दिवस समारोह समितीचे सचिव ॲड. संभाजीराव मोहिते, सुभेदार प्रशांत कदम, सलीम मुजावर, चंद्रकांत जाधव, प्रा. जालींदर काशिद, रत्नाकर शानभाग, राजगोंडा अपिने, एम. बी. शिंदे, चंद्रकांत नकाते, तळबीडच्या सरपंच मृणाली मोहिते, उपसरपंच संगिता मोहिते, माजी सरपंच जयवंतराव मोहिते, बाजीराव गायकवाड, उमेश मोहिते, विष्णु दुर्गावळे, राजेंद्र मोहिते, ग्रामविकास अधिकारी सुनील ढाणे यांच्यासह आजी–माजी सैनिक व ग्रामस्थ



तळबीड : सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या समाधीस्थळी अभिवादन करताना ब्रिगेडीयर जॉयदिप मुखर्जी, लेफ्टनंट कर्नल मंदार जाधव, लेफ्टनंट कर्नल समीर कुलकर्णी यांच्यासह ॲड. संभाजीराव मोहिते, प्रशांत कदम, सरपंच मृणाली मोहिते, उपसरपंच संगिता मोहिते, माजी सरपंच जयवंतराव मोहिते आदी.

मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी तळबीडच्या शाळेतील विद्यार्थिनींनी दांडपट्टा, तसेच विविध थरारक साहसी कसरती सादर केल्या. विद्यार्थिनींच्या शिस्तबद्ध व साहसी प्रात्यक्षिकांनी ब्रिगेडीयर मुखर्जी व उपस्थित सैन्याधिकारी भारावून गेले. त्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी पुढेही सैन्यदलात भरती होऊन देशसेवेसाठी योगदान द्यावे, असे आवाहन ब्रिगेडीयर मुखर्जी यांनी केले.

कार्यक्रमात ईश्वरी मोहितेची भारतीय हवाई दलात झालेल्या निवडीबद्दल, तसेच अल्पवयात लेफ्टनंट कर्नल पदापर्यंत मजल मारल्याबद्दल लेफ्टनंट कर्नल मंदार जाधव यांचा ब्रिगेडीयर जॉयदिप मुखर्जी यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. सरपंच मृणाली मोहिते यांनी मनोगत व्यक्त केले. माजी सरपंच जयवंतराव मोहिते यांनी प्रास्ताविक केले.

# सांगली मध्यवर्ती जिल्हा बँक नोकरभरती प्रकरणी चौकशी समिती नियुक्त

## सहकार विभागाचे आदेश,बँकेला बाजू मांडता येणार

**सांगली/प्रतिनिधी:–**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रियेबाबत निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने सखोल चौकशीसाठी स्वतंत्र समिती नियुक्त केली आहे. नोकरभरती करणारी एजन्सी, तक्रारदार आणि संबंधित जिल्हा बँकांना आपली बाजू समितीसमोर मांडता येणार आहे, याबाबत सहकार विभागाच्या अवर सचिव मंजुषा साळवी यांनी आदेश काढले आहेत.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतील नोकरभरती संदर्भात शासनाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी शासन निर्णय काढला होता. जिल्हा बँका नोकरभरती प्रकरणी संबंधित एजन्सी, तक्रारदार आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांती आवश्यक कागदपत्रांसह गुरुवारी (दि. १८) रोजी दुपारी साडेबारा वाजता समितीसमोर उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. समितीने सर्व तक्रारींची सखोल चौकशी करून पंधरा दिवसांत आपला अहवाल शासनास सादर करावा, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

निर्णयाविरोधात महाराष्ट्र सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी इन्स्टीट्युट ऑफ हार्डवेअर या संस्थेने उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने १४ नोव्हेंबर २०२५ रोजी ३१ ऑक्टोंबर २०२५ चा शासन निर्णय रद्द केला आणि याचिकाकर्ता एजन्सी तसेच अन्य हितसंबंधितांची २४ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रधान सचिव (सहकार व पणन) यांच्यासमोर सुनावणी घेण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाच्या आदेशानुसार प्रधान सचिव (सहकार व पणन) यांच्यासमोर चार सुनावण्या घेण्यात आल्या. या सुनावणीदरम्यान तक्रारदार अनिल मांगुळकर यांनी विविध कागदपत्रे सादर केली. तसेच सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या कार्यालयाकडे विविध जिल्हा बँकांमधील नोकरभरतीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींचा विचार करता या तक्रारींची सखोल चौकशी करणे आवश्यक



असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार नोकरभरती करणारी एजन्सी, तक्रारदार आणि संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# पुसेगावात आज परमपूज्य श्री...

पान १ वरुन मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, उपाध्यक्ष कृष्णा खोरे महामंडळ महेश शिंदे, आमदार शशिकांत शिंदे, खासदार नितीन पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार अतुल भोसले, आमदार मनोज घोरपडे, आमदार सचिन पाटील, जिल्हाधिकारी सातारा संतोष पाटील पोलीस अधीक्षक तुषार दोशी मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व विश्वस्त ग्रामपंचायतचे प्रभारी विशाल जाधव सर्व सदस्य पुसेगाव परिसरातील विविध संघटनेचे पदाधिकारी ग्रामस्थ भाविकांच्या उपस्थिती सकाळी साडेनऊ वाजता रथ पूजन करण्यात येणार आहे.

रथ पूजनानंतर श्री सेवागिरी महाराजांची प्रतिमा व पादुका ठेवलेल्या फुलांनी सजवलेल्या व नोटांच्या माळाने झोकाळलेला रथ पुसेगाव तून प्रदक्षिणेसाठी निघणार आहे. या मिरवणुकीत पुसेगाव व परिसरातील नामवंत झांज पथक, बँजो पथक बँड पथक सहभागी होणार आहेत. देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांना बुंदीचा प्रसाद मोफत वाटप करण्यात येणार आहे. श्री सेवागिरी मंदिर नारायणगिरी सभागृह व स्वागत कमानीवर आकर्षक विद्युत रोषणाई व रंगोटी करण्यात आली आहे.

सातारा ,कोरेगाव ,वडूज दहिवडी, फलटण इथून सुमारे तीनशे ते साडेतीनशे ज्यादा एसटी गाड्या सोडण्यात येणार आहेत. तसेच पुसेगाव परिसरातील गावोगावी गाड्यांची सोय करण्यात आली आहे. पुसे गावाच्या चारही दिशांना एसटी महामंडळाने पिक अप सेड उभारले आहेत.

पुसेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राने विविध उपाय योजना ची तयारी केली आहे. यात्रा काळात जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार जोशी व कोरेगाव उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसेगाव पोलीस स्टेशनचे सपोनी संदीप पोमन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे. कायदा व सुव्यवस्थेसाठी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची ज्यादा फौज तैनात करण्यात आली आहे. पुसेगाव ग्रामपंचायत च्या वतीने भाविक व ग्रामस्थांसाठी सर्व सुविधांची सोय करण्यात आली असल्याचे प्रभारी सरपंच विशाल जाधव यांनी सांगितले.

# कराड उपजिल्हा रुग्णालयास वरिष्ठ डॉक्टरांकडून कायाकल्प अंतर्गत पाहणी

**कराड/प्रतिनिधी :**

भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या कायाकल्प योजनेअंतर्गत कराड उपजिल्हा रुग्णालयाची बुधवारी सखोल पाहणी करण्यात आली. सोलापूर जिल्हा रुग्णालयातील प्रशासकीय प्रवक्ते व जनरल सर्जन डॉ. महेश कोडोलकर तसेच मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुलोचना जाधव यांनी रुग्णालयास भेट देऊन विविध विभागांची पाहणी केली.



या पाहणीदरम्यान दोन्ही वरिष्ठ डॉक्टरांनी रुग्णालयातील स्वच्छता, आरोग्य सेवा, कचरा व्यवस्थापन, रुग्ण सुविधा आदी बाबींचा आढावा घेतला. तसेच रुग्णांशी थेट संवाद साधून उपलब्ध सेवांबाबत त्यांची मते जाणून घेतली. रुग्णालयाच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करताना काही महत्त्वाच्या सुधारणा व सूचना त्यांनी उपजिल्हा रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. सुनीता लाळे यांना दिल्या. कायाकल्प योजना ही सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये स्वच्छता, संसर्ग प्रतिबंध व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने राबविली जाते. या योजनेअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आरोग्य संस्थांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात येते. कराड उपजिल्हा रुग्णालयाने या योजनेत अधिक प्रभावी कामगिरी करावी, अशी अपेक्षा पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

या पाहणीमुळे रुग्णालयाच्या आरोग्य सेवांमध्ये आणखी सुधारणा होण्यास चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# बनावट कागदपत्रे तयार करून शिक्षक बँकेत भरती प्रक्रिया

## रूपाली गुरव

**सांगली/प्रतिनिधी:–**

प्राथमिक शिक्षक बँकेत बनावट कागदपत्रे तयार करून नोकर भरती प्रक्रिया राबविण्याचा प्रयत्न झाला होता. या विरोधात दहा संचालकांनी भरती प्रक्रिया थांबविण्याचे पत्र दिल्यानंतर ही भरती प्रक्रिया स्थगित झाली आहे. या प्रकरणी माजी अध्यक्ष विनायक शिंदे यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी बँकेच्या अध्यक्षा रूपाली गुरव यांनी पत्रकार बैठकीत केली.

त्या म्हणाल्या, प्राथमिक शिक्षक बँकेत नोकर भरती होणार असल्याची जाहीरात नुकतीच प्रसिध्द झाली होती. ही माहिती संचालकांना मिळाली. नोकर भरतीबाबत बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत कोणतीही चर्चा, निर्णय झालेला नाही. याची अध्यक्ष म्हणून मलाही कल्पना नाही. माझ्या परस्पर बँकेतील नोकर भरतीची जाहीरात सातारा जिल्हा नागरी बँक असोसिएशनच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली. याबाबतच माहिती घेतली असताना बँकेचे माजी अध्यक्ष विनायक शिंदे यांनी बनावट कागदपत्राच्या आधारे काही संचालक व अधिकाऱ्यांना हाताशी धरून संगमताने सातारा जिल्हा नागरीक बँक असोसिएशनशी भरती प्रक्रिया राबवण्याचा करार केल्याचे उघडकीस आले आहे.

याला माझ्यासह संचालकांनी लेखी विरोध केला असून सदरची भरती प्रक्रिया थांबवण्याचे पत्र सातारा जिल्हा नागरी बँक असोसिएशनला दिले आहे. त्यानुसार सदरची भरती प्रक्रिया स्थगित आहे. शिक्षक बँकेच्या संचालक मंडळाच्या उपसिमतीची बैठक झाली असून त्या बैठकीत भरती प्रक्रिया राबवण्याचे व याबाबतचा करार करण्याचा अधिकारी बँकेने विनायक शिंदे यांना दिला आहे. असा या उपसमितीचा ठाराव विनायक शिंदे यांनी सातारा जिल्हा नागरीक बँक असोसिएशनला सादर केला आहे. हा ठराव बनावट आहे, त्यामुळे माजी अध्यक्षांवर कारवाई करावी, अशी मागणी केली असल्याचे रूपाली गुरव यांनी सांगितले. तसेच शिक्षक बँकेत तीन वर्षे अध्यक्ष म्हणून विनायक शिंदे यांनी काम केले होते. या काळात त्यांनी एकहाती व मनमानी कारभार केला. संचालक मंडळाच्या अधिकारातील अनेक गोष्टी त्यांनी परस्पर निर्णय घेवून काही संचालक व अधिकाऱ्यांच्या संगमताने केल्या आहेत. याची देखील चौकशी करण्यात येणार असल्याचे रूपाली गुरव यांनी सांगितले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL EHV PC O&M Zone, Karad invites online bids from reputed and registered bidders on Mahatransco SRM E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for following works:-

1. Tender for Supply, installation and commissioning of 1.5 Ton Split type Air Conditioner without duct at various Sub-Stations under EHV PV O&M Zone Karad. RFx. No.7000038423. The Estimated amount is Rs. 1,43,79,360/- (Including Taxes) and due date for submission is 02.01.2026, 10:00 Hrs.

For further details visit our above said website.

**Chief Engineer, EHV PC O&M Zone, Karad.**



**ग्रामपंचायत मौजे बाबरमाची (स.गड)**

**ता.कराड, जि.सातारा**

ग्रामपंचायत मौजे बाबरमाची (स.गड) कडील खालील नमुद कामाची निविदा मान्यता प्राप्त निविदा धारकाकडून मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | निविदा रक्कम रूपये | बयाणा रक्कम रूपये | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे बाबरमाची ता.कराड येथे अंतर्गत आर सी सी बंदिस्त गटर करणे. | १५ वा वित्त आयोग | १,८२,६००/- | १८२६/- | २००/- |

कामाच्या अटी व शर्ती:

१)कामाचे निविदा फॉर्म जाहिरात प्रसिद्ध केले पासून २४/१२/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून मिळतील.
२)कामाची निविदा स्वतंत्र व सीलबंद लखोट्यात कामाचे नाव नमूद करून दि.२४/१२/२०२५ दुपारी ३.०० वा पर्यंत स्वीकारली जाईल.
३)सर्व शासकीय कपाती ह्या बिलातून कपात केल्या जातील.
४)निविदा मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार ग्रा.पं. बाबरमाची यांनी राखून ठेवला आहे.
५)कामाची संबंधित अंदाजपत्रके कार्यालयीन वेळेत ग्रा.पं.बाबरमाची येथे पहावयास मिळतील.
६)काम वेळेत पूर्ण न झालेस कोणतीही पूर्वसूचना न देता काम रद्द केले जाईल.
७)अंदाजपत्रकातील तरतुदी प्रमाणे काम न झालेस कोणतीही पूर्वसूचना न देता काम रद्द केले जाईल.
८)लखोटा क्र.१ मध्ये सर्व आवश्यक कागदपत्रे, छायांकित प्रत व बयाणा रक्कम चलन जोडणे तद्नंतर लखोटा क्र.२ उघडणेत येईल.

सदर कामी विहित मुदतीत न आलेल्या बयाणा रक्कम न भरलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच दरपत्रके सीलबंद करून कामनिहाय नाव व पत्यासह देणे.

सही/-
प्रशासक
ग्रामपंचायत बाबरमाची (स.गड)
ता.कराड जि.सातारा

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत बाबरमाची (स.गड)
ता.कराड जि.सातारा


# सांगलीत मुख्यमंत्री दौऱ्यात आंदोलक घुसलेच कसे ?

## पोलिस, प्रशासन धारेवर; दोषींवर कारवाई ?

**सांगली/प्रतिनिधी:–**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सांगली दौऱ्यावर आले होते. त्यावेळी काही आंदोलकांनी त्यांच्यासमोर फलक घेऊन निषेध व्यक्त केले. तसेच कार्यक्रमस्थळीही काहींनी निवेदन दिले. यासह सुरक्षा यंत्रणा भेदून अनेकांनी प्रवेश केला. याबाबत पोलिस, प्रशासनाला धारेवर धरण्यात आले आहे. आज सकाळपासून बैठकांचे सत्र सुरू होते. यातील दोषींवर कारवाई होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, सांगली गेल्या काही दिवसांपासून भयमुक्त, नशामुक्त अभियान सुरू आहे. त्यातील पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्याची वेळ मागितली होती. मात्र, सुरक्षेचे कारण पुढे करत त्यांना ही भेट नाकारण्यात आली. कार्यक्रमापुर्वी निमंत्रक तानाजी सावंत, सतीश साखळकर, शंभुराज काटकर यांच्यासह पदाधिकाऱ्यांना स्थानबद्ध करण्यात आले होते. दुपारी मुख्यमंत्र्यांचे हेलिकॉप्टर कवलापूर विमानतळावर दाखल झाले. त्यानंतर ताफा माधवनगर रस्ता मार्गे कार्यक्रमस्थळी निघाला. त्यावेळी संजयनगर हद्दीत काही आंदोलकांनी फलक हाती घेत जोरदार घोषणाबाजी केली. त्याचे व्हिडिओही व्हायरल झाले. त्यानंतर कार्यक्रमस्थळी सुरक्षा यंत्रणा भेदून अनेकजण गर्दी करताना दिसून आले. मुख्यमंत्री सुरक्षा यंत्रणेला आव्हान देणारे कृत्य अनेक कॅमेरात टिपले गेले. काहींनी खुद्द पोलिस अधीक्षकांसमोरच निवेदन दिले. आणि मुख्यमंत्र्यांनी ते स्विकारले.

अत्यंत महत्वाच्या दौऱ्यात हा हलगर्जीपणा आता चव्हाट्यावर आला आहे. पोलिस, प्रशासन धारेवर धरले असून सकाळपासून बैठकांचे सत्र सुरू आहे. वरिष्ठ कार्यालयाकडून अहवाल मागवल्याचेही समजते आहे. सांगलीतील वरिष्ठ अधिकारी तातडीने सायंकाळी बंदोबस्त कामी असणाऱ्या पोलिस अधिकारी, अंमलदारांची बैठक घेतल्याचेही समजते. लवकरच दोषींवर कारवाईचे संकेत मिळतात. निवडणूकीच्या तोंडावर झालेल्या या कार्यक्रमात सुरक्षा यंत्रणेचे दोष आता समोर आले आहेत. वरिष्ठ कोणती कारवाई करणार हे यथावकाश समोर येईल. मात्र, हलगर्जीपणाची वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेतली आहे.

### ठिकाण बदलले अन् गोंधळ उडाला

सांगलीत कवलापूर येथे अधिकृत अशी तीन हेलिपॅड बनवण्यात आली आहे. मात्र, काहींच्या हट्टापोटी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात उतरवण्याचा घाट सुरू होता. त्यासाठी हेलिपॅड बनवण्यात आले होते. परिसराची स्वच्छता करण्यात आली होती. पोलिसांचा बंदोबस्त, सरावही झाला होता. आदल्यादिवशी रात्री मुख्यमंत्री कार्यालयातून दौरा आल्यानंतर कवलापूर विमानतळ निश्चित झाले. त्यानंतर सारा बंदोबस्त त्याठिकाणी नेण्यात आला. यामुळे गोंधळ उडाल्याचे समजते.


# ५३ वे वाई तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

## पतित पावन विद्यामंदिर ओझर्डे येथे आयोजन

**वाई/ प्रतिनिधी:–**

ओझर्डे ता .वाई येथे सातारा जिल्हा परिषद, पंचायत समिती वाई शिक्षण विभाग व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित पतित पावन विद्यामंदिर ओझर्डे, ता. वाई, जि. सातारा यांचे सुयक्त विद्यमाने वाई तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन शास्त्रज्ञ डॉ विक्रम साराभाई नगरी मध्ये आयोजित करण्यात आले होते.

प्रर्दशनाचे उद्घाटन हर्षवर्धन मोरे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वाई यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर चे सातारा जिल्हा विभाग प्रमुख व सातारा जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव प्राचार्य शशिकांत काटे उपस्थित होते. ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार या संस्थेच्या ब्रिदवाक्या नुसार जनमानसा मध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा या उद्देशाने ही विज्ञानयात्रा बाल वैज्ञानिकां साठी पर्वणी असल्याचे मनोगत हर्षवर्धन मोरे यांनी मांडले. तर श्री स्वामी विवाकनंद शिक्षण संस्थेतील ओझर्डे या आमच्या संस्कार केंद्रास ही संधी उपलब्ध करुन दिली या बद्दल प्राचार्य शशिकांत काटे यांनी शासनाचे आभार मानले. व एक दर्जेदार आयोजन विद्यालयाने केल्याने मुख्याध्यापक सर्व गुरुदेव कार्यकर्ते यांचे कौतुक केले. यावेळी साईनाथ वाळेकर, शिक्षण विस्तार अधिकारी,, दिलीप बाबर शिक्षण विस्तार अधिकारी, शकील मोमीन शिक्षण विस्तार अधिकारी, गोरखनाथ गोरे अध्यक्ष मुख्याध्यापक संघ, लालासो शिंदे अध्यक्ष वाई तालुका विज्ञान संघ, गिरीश गायकवाड सचिव विद्यासमिती सातारा जिल्हा, सचिन माने, संचालक श्री स्वामी पतसंस्था कोल्हापूर शेखर फरांदे सरपंच ओझर्डे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पैलवान संदीप रायते शालेय सल्लागार समितीचे , अध्यक्ष प्रशांत कामठे सर्व केंद्र प्रमुख शिक्षण विभाग पंचायत समिती जिल्हा परिषद व वाई तालुक्यातील माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, मार्गदर्शक



शिक्षक बाल वैज्ञानिक विद्यार्थी व हितचिंतक ग्रामस्थ, पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी मा नामदार मकरंद पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री महाराष्ट्र राज्य. तसेच प्रांताधिकारी योगेश खरमाटे, शिक्षणाधिकरी धनंजय चोपडे यांनी दुरध्वनी व्दारे शुभेच्छा दिल्या.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कौस्तुभ गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर उपस्थित होते. सर्व मुख्याध्यापक शिक्षक यांना भेटण्याची संधी मिळाली त्याबद्दल आभार व्यक्त केले .

आमच्या संस्थेच्या नेहमीच अग्रेसर असणारी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा पारितोषिक प्राप्त या विद्यालयास ही संधी दिली व त्यांनी एका राज्यस्तरीय आयोजना प्रमाणे हे प्रदर्शन संपन्न केले असून गुरुदेव कार्यकर्ते यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य कॅप्टन डॉ महेश गायकवाड, सहायक विभाग प्रमख श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांनी बालवैज्ञानिक व उपस्थित सर्व शिक्षक गुरुदेव कार्यकर्ते यांना मार्गदर्शन करुन पारितोषिक प्राप्त विद्यार्थी व त्यांचे मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन केले.

या प्रदर्शना मध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी प्राथमिक गटात ७६ उपकरणे इयत्ता ९ वी ते १२ वी माध्यमिक व उच्चमाध्यमिक गटात २६ उपकरणे व शिक्षक गटात ३ उपकरणे सहभागी झाली. तसेच या सर्व गटामधुन प्रश्नमंजूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या समारोप समारंभा मध्ये सर्व गटातून प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थी व शिक्षक यांना तसेच वाई तालुक्यातील सर्व ५७ माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य मुख्याध्यापक यांना कौस्तुभ गावडे श्री स्वामी विवेकांनद शिक्षण संस्था कोल्हापूर यांचे शुभहस्ते सन्मान चिन्ह व शाल देवून सन्मानीत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्तावीक मुख्याध्यापक गिरीश गायकवाड, गटशिक्षणाधिकारी हर्षवर्धन मोरे यांनी तर आभार साईनाथ वाळेकर, यांनी मानले. सर्व कार्यक्रमाचे निवेदन प्रतिभा बेलोशे सचिन माने यांनी केले. हे विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील समिर आत्तार, रविंद्र राठोड, सारिका शिंदे, नेत्रा सोनावणे, धनश्री कारंडे, रेश्मा आत्तार व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

